|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade
NAAC Re-Accredited
(4th Cycle)

## वित्त व लेखा अधिकारी यांचे कार्यालय

जा.क्र. कबचौउमवि/वित्त विभाग/08/666/2023 दिनांक 01.12.2023

## -: परिपत्रक :-

प्रति,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी
संलग्नीत सर्व महाविद्यालयांचे
मा.प्राचार्य तथा संस्थांचे मा.संचालक ... ...

**विषय**:- विद्यापीठास सादर करण्यात येणा-या बिलांच्या अनुषंगाने जोडलेली प्रमाणपत्रे, तसेच सर्व ऑडीट व आश्वासन कार्यासाठी सनदी लेखापालांनी व्युत्पन्न केलेला UDIN (**Unique Document Identification Number**) नमूद करणेबाबत .......

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, संलग्नीत महाविद्यालये तसेच संस्थांमार्फत विद्यापीठास निरनिराळया प्रकारची बिले व संबंधित कागदपत्रे सादर केली जातात. तथापि, सदर बिले, कागदपत्रे फाईलमध्ये सादर करतेवेळी त्यावर संबंधित सनदी लेखापालांनी व्युत्पन्न केलेला, प्रमाणपत्रावरील 18 डिजिटचा UDIN (**Unique Document Identification Number**) नमूद केलेला नसतो.

उपरोक्तबाबत आपणास विदीत करण्यात येते की, आयसीएआय नुसार सर्व प्रॅक्टिस करणा-या सनदी लेखापालांस त्यांच्याव्दारे दिनांक 1 फेब्रुवारी, 2019 पासून जारी केलेल्या प्रमाणपत्रांसाठी, जीएसटी आणि इन्कमटॅक्स ऑडीटसाठी, सर्व ऑडीट आणि आश्वासन कार्यांसाठी तसेच वैधानिक लेखा परीक्षणाच्या अधीन ताळेबंदासाठी UDIN घेणे बंधनकारक असून, यापुढे आपणामार्फत सादर करण्यात येणा-या बिलांच्या व संबंधित कागदपत्रांच्या अनुषंगाने सनदी लेखापालांनी व्युत्पन्न केलेला 18 डिजिटचा UDIN नमूद करणे अनिवार्य राहील. सदर UDIN नमूद नसल्यास, कोणत्याही सबबीवर बिले/कागदपत्र यांचा स्विकार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घेऊन, याबाबत कृपया कोटेकोरपणे कार्यवाही करण्यात यावी, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

**(सीए रविंद्र ना. पाटील)**
वित्त व लेखा अधिकारी

प्रत माहिती तथा कार्यवाहीस्तव:-

1) सर्व शैक्षणिक प्रशाळांचे/ विभागांचे मा.संचालक/ विभागप्रमुख, तसेच सर्व प्रशासकीय विभागांचे विभागप्रमुख तथा नियंत्रक अधिकारी, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.
2) मा.मानद संचालक, प्रताप तत्वज्ञान केंद्र, अमळनेर.
3) मा.कार्यकारी संचालक, महात्मा गांधी तत्वज्ञान केंद्र, धुळे.
4) मा.नियंत्रक अधिकारी, एकलव्य प्रशिक्षण केंद्र, नंदुरबार.

कृपया उपरोक्त नमूद केलेल्या बाबीची नोंद घ्यावी तसेच आपल्या विभागामार्फत अशा प्रकारची बिले/ कागदपत्रे वित्त विभागास अग्रेषित करण्यापूर्वी त्यावर सनदी लेखापालांच्या प्रमाणपत्रावरील UDIN नमूद असल्याची खात्री करावी, ही विनंती.

**(सीए रविंद्र ना. पाटील)**
वित्त व लेखा अधिकारी

प्रतिलिपी माहितीस्तव:-

1) मा.कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
2) मा.प्र-कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
3) मा.कुलसचिव, कबचौउमवि, जळगाव